ePaper

# देशातील गृहिणींना मोदी सरकारचे रक्षाबंधन 'गिफ्ट'; 200 रुपयांनी गॅस सिलींडर स्वस्त



| वर्ष - 7 | अंक - 118 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 30 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



*आश्विन महिन्याच्या शुक्ल पक्षातील श्रवण नक्षत्राच्या दिवशी ओणम सण साजरा केला जातो. केरळी बांधव पारंपारिक पोशाख परिधान करतात आणि एकमेकांना शुभेच्छा देतात. फुलांच्या रांगोळीलाही या दिवशी विशेष महत्त्व असते. निगडीतील श्रीकृष्ण मंदिरात ओणम सणाची टिपलेली हे छायाचित्र.*

# राष्ट्रीय समाज पक्ष राज्यात स्वबळावरच लढणार!

## » महादेव जानकर यांची घोषणा

| पुणे | महाईन्यूज |

राज्यात आज भाजपने मित्रपक्ष फोडले. पण काँग्रेस सत्तेवर होती तेव्हा त्यांनी पण छोट्या पक्षांना खाण्याचच काम केलं.ज्यांना आम्ही सत्तेत बसवलं त्यानां खाली खेचायची ताकद देखील आमच्यात आहे, असे म्हणत राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर यांनी आगामी लोकसभा निवडणुका स्वबळावर लढण्याचा नारा दिला. तसेच स्वतःच घर मजबूत करा अन् रासपचं सरकार आणा, असा सल्ला देखील त्यांनी कार्यकर्त्यांना दिला.

राष्ट्रीय समाज पक्षाच्यावतीने काढण्यात आलेल्या जनसुराज्य यात्रेच्या पहिल्या टप्प्याचा समारोप आज पुण्यात झाला. त्यानंतर राष्ट्रीय समाज पक्षाचा 20 वा वर्धापन दिन गणेश कला क्रीडा मंच येथे साजरा करण्यात आला. यावेळी देशाभातील कार्यकर्त्यांना संबोधित करताना माहादेव जानकर बोलत होते.



"या क्षणाला राष्ट्रीय समाज पक्ष मोठा कसा करायचा आणि रासपची दिल्ली आणि राज्यात शासन कसं येईल, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आगामी लोकसभा निवडणुकीच्या देशातील 543 जागा आम्ही स्वबळावर लढणार आहोत. तसेच मिर्झापूर (उत्तर प्रदेश), परभणी, माढा, बारामती यापैकी एका ठिकाणाहून लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी उत्सुक आहे.

**– महादेव जानकर, राष्ट्रीय समाज पक्ष.**

# पवना नदीच्या नाल्यावर 'सीसीटीव्ही'

## » प्रदूषण करणाऱ्यांना प्रतिबंध: महापालिका प्रशासनाचा पुढाकार

| पिंपरी | महाईन्यूज |

**पवना नदीपात्रात रावेत बंधार ते केजुदेवी बंधारा दरम्यान कोणीतरी रसायन मिश्रीत पाणी सोडल्यामुळे नदीपात्र फेसाळल्याचा नुकताच प्रकार घडला. शहरालगतच्या भागातील काही व्यवसायिकांकडून टँकरद्वारे रसायनमिश्रित पाणी सोडले जात असल्याचा संशय आहे. त्याठिकाणी नदीला जोडणाऱ्या दोन नाल्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत, अशी माहिती पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी यांनी सांगितले..**



पवना नदीपात्रालगत एकही कंपनी सध्या सुरू नाही. त्यामुळेच सोमवारी (दि. २१) सकाळी पवनेचे पात्र फेसाळल्याचे निदर्शनास आले. आम्ही त्याठिकाणी जाऊन पाहणी केली. सर्वेक्षणात दोन्ही नाल्यांमधून रसायनमिश्रित पाणी येत असल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे नदीपात्राला येऊन मिळणाऱ्या दोन्ही नाल्यांवर आता सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला आहे. त्याद्वारे मध्यरात्री कोणीही रसायनमिश्रित पाणी सोडताना आढळल्यास त्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल,असे सह शहर अभियंता कुलकर्णी यांनी सांगितले.

### रसायन मिश्रीत पाणी नदीत...

» या भागातील व्यवसायिकांना नोटिसा पाठवून रसायन मिश्रित पाणी सोडल्यास कारवाई केली जाणार असल्याचे कळविले आहे. त्यामुळे नदीपात्रालगत असा प्रकार घडणे शक्य नाही. मात्र, रावेत बंधारा ते केजुदेवी बंधारा परिसरात दोन नाले नदीपात्राला येऊन मिळतात. दोन्ही नाल्यांना परिसरातील ड्रेनेज लाइन जोडल्या आहेत. मध्यरात्री या कंपनी सध्या सुरू नाही. बहुतांश नाल्याद्वारे कोणीतरी रसायन मिश्रित पाणी नदीपात्रात सोडत असल्याचा संशय आहे.

# ..अन्यथा चंद्रकांत पाटील यांच्या घराबाहेर ठिय्या आंदोलन करणार!

## आमदार रवींद्र धंगेकर यांचा पत्रकार परिषदेत इशारा

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**कसबा विधानसभा मतदारसंघासाठी लवकरात लवकर १० कोटींचा निधी न दिल्यास चंद्रकांत पाटील यांच्या घराबाहेर एक दिवसीय ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा आमदार रवींद्र धंगेकर यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेऊन दिला.**

राज्य सरकार मार्फत कसबा विधानसभा मतदारसंघातील पायभूत सुविधा करिता १० कोटींचा निधी मंजूर झाला होता. मात्र तो निधी अचानकपणे पर्वती मतदारसंघामध्ये वळविण्यात आला आहे. यामागे भाजपाचे नेते पालकमंत्री चंद्रकांत पाटील हे असून कसबा विधानसभा मतदारसंघासाठी लवकरात लवकर १० कोटींचा निधी न दिल्यास चंद्रकांत पाटील यांच्या घराबाहेर एक दिवसीय ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा आमदार रवींद्र धंगेकर यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेऊन दिला. आमदार रवींद्र धंगेकर म्हणाले की, कसबा विधानसभा पोटनिवडणूक होऊन जवळपास सात महिन्यांचा कालावधी होऊन गेला. त्या काळात मी राज्य सरकारकडे जवळपास १०० कामे



सुचविली होती. त्यासाठी १० कोटींचा निधीदेखील मंजूर झाला होता. पण अचानकपणे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी निधी पर्वती विधानसभा मतदारसंघात वळविल्याची माहिती समोर आली आहे. या कृतीमधून भाजपाच्या नेत्याकडून कुरघोडीचे राजकारण सुरू आहे. या कृतीचा मी जाहीर निषेध व्यक्त करतो. तुम्ही माझा अपमान करा, तो मी अपमान सहन करेल. पण मी माझ्या मतदारसंघातील नागरिकांचा अपमान सहन करणार नाही. त्यामुळे शहरातील ज्या ठिकाणी चंद्रकांत पाटील कार्यक्रमासाठी जातील, त्या ठिकाणी मी आंदोलन करून जाब विचारणार असल्याचे त्यांनी सांगितले. या सर्व प्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी लक्ष घालून निधीबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी केली आहे. पण त्यांनी लवकरात लवकर लक्ष घालून निर्णय न घेतल्यास चंद्रकांत पाटील यांच्या कोथरूड येथील घराबाहेर एक दिवसीय ठिय्या आंदोलन करणार असल्याचा इशारा धंगेकर यांनी दिला.

### आंदोलन करून जाब विचारणार

» १० कोटींचा निधीदेखील मंजूर झाला होता. पण अचानकपणे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी निधी पर्वती विधानसभा मतदारसंघात वळविल्याची माहिती समोर आली आहे. या कृतीमधून भाजपाच्या नेत्याकडून कुरघोडीचे राजकारण सुरू आहे. या कृतीचा मी जाहीर निषेध व्यक्त करतो. तुम्ही माझा अपमान करा, तो मी अपमान सहन करेल. पण मी माझ्या मतदारसंघातील नागरिकांचा अपमान सहन करणार नाही. त्यामुळे शहरातील ज्या ठिकाणी चंद्रकांत पाटील कार्यक्रमासाठी जातील, त्या ठिकाणी मी आंदोलन करून जाब विचारणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# श्वानांच्या लसीकरण, मोहिमेत अडथळा!

## महापालिकेकडून कारवाईचा इशारा

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शहरातील मोकाट श्वान आणि मांजरांचे लसीकरण. नसबंदी करण्यासाठी महापालिकेने दोन संस्थांची नियुक्ती केली आहे. मात्र, या संस्थांच्या कामात नागरिकांकडून अडथळा निर्माण केला जात असल्याने मोहीम रखडली असल्याचे स्पष्ट झाले आहे. या मोहिमेला विरोध करणाऱ्या नागरिकांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिला आहे.**

शहराच्या हद्दीतील मोकाट श्वान आणि मांजरांची नसबंदी शस्त्रक्रिया तसेच लसीकरण करण्याची मोहीम महापालिकेच्या आरोग्य विभागाने हाती घेतली आहे.

त्यासाठी ॲनिमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडिया यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. महापालिकेच्या स्थायी समितीने १६ एप्रिल २०२० मध्ये युनिव्हर्सल ॲनिमल वेलफेअर सोसायटी आणि कॅनाइन कंट्रोल, केअर ट्रस्ट या दोन संस्थांची नियुक्ती केली आहे. शहरातील मोकाट श्वान आणि मांजरांची नसबंदी शस्त्रक्रिया आणि लसीकरण या दोन संस्थांकडून करण्यात येत आहे. मात्र, लसीकरण करण्यात आलेले मोकाट श्वान आणि मांजरे आपल्या भागात सोडण्यात येऊ नये, यासाठी संस्थेच्या कर्मचाऱ्यांना दमदाटी करण्यात येत आहे. त्यामुळे या मोहिमेला अडथळा निर्माण झाला.

अडथळा निर्माण करणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे महापालिकेचे आरोग्यप्रमुख डॉ. भगवान पवार यांनी स्पष्ट केले. या मोहिमेला विरोध करणाऱ्या नागरिकांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिला आहे.




### मार्गदर्शक सूचनांनुसार ही मोहीम

» शहराच्या हद्दीतील मोकाट श्वान आणि मांजरांची नसबंदी शस्त्रक्रिया तसेच लसीकरण करण्याची मोहीम महापालिकेच्या आरोग्य विभागाने हाती घेतली आहे. त्यासाठी ॲनिमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडिया यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. महापालिकेच्या स्थायी समितीने १६ एप्रिल २०२० मध्ये युनिव्हर्सल ॲनिमल वेलफेअर सोसायटी आणि कॅनाइन कंट्रोल, केअर ट्रस्ट या दोन संस्थांची नियुक्ती केली आहे. शहरातील मोकाट श्वान आणि मांजरांची नसबंदी शस्त्रक्रिया आणि लसीकरण या दोन संस्थांकडून करण्यात येत आहे.

# प्र- कुलगुरू निवडीवर कुलगुरूंचे स्पष्टीकरण

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्र- कुलगुरूपदी डॉ. पराग काळकर यांची केलेली नियुक्ती वादात सापडली आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी डॉ. काळकर यांच्या निवडीबाबत स्पष्टीकरण दिले. तसेच सर्व कायदेशीर बाबी तपासूनच डॉ. पराग काळकर यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्र- कुलगुरूपदी निवड करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. काळकर यांच्यावर आर्थिक प्रकरणात गुन्हा दाखल असल्याने विद्यापीठाच्या प्र- कुलगुरू पदावरील त्यांच्या निवडीवर विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आक्षेप घेतला.

तसेच ही निवड तातडीने रद्द करण्याची मागणी केली. तसेच काही संघटनांकडूनही या निवडीवर आक्षेप घेण्यात आला. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी स्पष्टीकरण दिले.

विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार सर्व नियमांचा अभ्यास करूनच प्र- कुलगुरूपदी डॉ. पराग काळकर यांची नुकत्याच झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निवड करण्यात आली. कुलगुरू आणि प्र- कुलगुरू यांच्यात एकवाक्यता असावी, हा विद्यापीठ कायद्यातील तिसऱ्या सुधारणेमागचा मूळ उद्देश होता.

कायद्यातील तरतुदीनुसार प्र- कुलगुरू निवडीचा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या संमतीनेच घेण्यात आला. प्र- कुलगुरू पदासाठी प्राप्त झालेल्या अर्जांमधून योग्य उमेदवार निवडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. सर्व कायदेशीर बाबी तपासूनच डॉ. काळकर यांची निवड करण्यात आल्याचे डॉ. गोसावी यांनी नमूद केले.

# शिक्षण विभागावर ‘कोअर कमिटी’!

## आयुक्त शेखर सिंह यांची माहिती : गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी, सर्व शिक्षकांना नियमित मदत मिळावी, शैक्षणिक गुणवत्तेत भर पडत राहावी तसेच शिक्षण विभागामार्फत राबविले जाणारे उपक्रम अधिक सक्षमपणे शाळांपर्यंत पोहोचवण्यासाठी शिक्षण विभागाने १८ सदस्यीय संघाची (कोअर टीम) स्थापना केली आहे, अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.**



शिक्षण विभागामार्फत राबविल्या जाणारे विविध कार्यक्रम, योजना, उपक्रम तसेच या कार्यक्रमांचे नियोजन, अंमलबजावणी आणि आढावा घेण्यासाठी कोअर टीमची भूमिका महत्वाची असणार आहे, असेही ते म्हणाले.

कोअर टीमबाबत माहिती देताना शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात म्हणाले, आयुक्त शेखर सिंह यांच्या संकल्पनेतून शिक्षण विभागाच्या मदतीसाठी कोअर टीमची प्राथमिक व माध्यमिक विभागासाठी स्वतंत्र स्थापना करण्यात आली आहे. ही कोअर टीम शिक्षण विभागामार्फत राबविल्या जाणा-या शैक्षणिक उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये तसेच अध्यापनासंदर्भात सहाय्यकारक ठरेल असे काम करणार आहे. महापालिकेच्या शाळांव्यतिरिक्त इतर शाळांमध्ये शिक्षणाची प्रक्रिया कशी चालते, विविध प्रकारे विद्यार्थ्यांना अध्यापन कसे केले जाते या दृष्टीकोनातून क्षमता बांधणीसाठी या टीममधील सदस्यांसोबत अभ्यास दौऱ्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमांतर्गत तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण आणि विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा वाढेल असे वातावरण निर्माण करण्यासाठी नवीन धोरणांची आखणी शिक्षण विभागाकडून केली जात आहे. तसेच नामांकित सार्वजनिक शाळांना भेट देण्याबाबत शिक्षण विभागाकडून भविष्यातील शैक्षणिक दूरदृष्टीकोन विचारात घेऊन विविध धोरण आणि उपक्रम आखले जाणार आहेत.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, विविध अग्रगण्य शिक्षण संस्थांना दिलेल्या भेटीमुळे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये नवीन शैक्षणिक धोरणे आखण्यास मदत होत आहे. ही प्रक्रिया नुकतीच सुरू झाली आहे. या संपूर्ण प्रक्रियेत पालकांचा सहभागही तितकाच महत्वाचा आहे. महापालिका शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षण हा प्रेरणादायी अनुभव बनवण्यासाठी महापालिका नेहमीच प्रयत्नशील असते आणि यासाठी भविष्यात आम्ही कोअर टीमच्या साहाय्याने दिल्ली पब्लिक स्कूलला भेट देण्याची योजना आखत आहोत.

### कोअर टीमची कार्यपद्धती...

- शिक्षक व विद्यार्थ्यांपर्यंत विविध कार्यक्रम पोहचवण्यासाठी शिक्षण विभाग व शाळा यामध्ये दुवा म्हणून काम करणे.
- शिक्षण विभागातर्फे राबवले जाणारे उपक्रम शिक्षक व विद्यार्थ्यांपर्यंत व्यवस्थित पोहोचले आहेत का, हे जाणून घेण्यासाठी कार्यक्रमांचा आढावा घेणे आणि मूल्यमापन करणे.
- कोअर टीमची जबाबदारी सोपविलेल्या संबंधित शिक्षकाने झालेल्या कामाचा दरमहा आढावा देणे कार्यक्रम राबविल्यानंतर त्याबाबतचा अहवाल तयार करून तो संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठवणे
- कोअर टीममधील सदस्यांच्या क्षमता बांधणीसाठी महिन्यातून एक कार्यशाळा आयोजित करणे.

# स्थानिक स्पर्धामधूनच उद्याचे प्रज्ञानंद घडतील !

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांची भावना : कै. सुरेश चोंधे-पाटील स्मृतीनिमित्त बुद्धिबळ स्पर्धा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बुद्धिबळ स्पर्धेत भारताचा खेळाडू प्रज्ञानंद उत्कृष्ट कामगिरी करत जागतिक विजेतेपद स्पर्धेत उपविजेता ठरला. सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येत प्रज्ञानंदने दिलेली लढत हा सर्व देशवासियांसाठी कौतुकाचा विषय ठरला. चोंधे कुटुंबीयांनी यांनी घेतलेल्या बुद्धीवर स्पर्धेतून प्रज्ञानंद सारखे दर्जेदार खेळाडू निर्माण होण्यासाठी प्रेरणा मिळेल, असा आशावाद भारतीय जनता पक्षाचे पिंपरी%चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केला.**




सांगवी येथील बीएस नायक स्पोर्ट्स फाउंडेशन आणि विश्वविजेते चेस अकॅडमीच्या वतीने कै. सुरेश चोंधे-पाटील स्मृती चषक एकदिवसीय जलद (रॅपिड) खुली बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण प्रसंगी शंकर जगताप बोलत होते. यावेळी चिंचवड विधानसभेच्या आमदार अश्विनी जगताप, भाजपा नेते श्री.सचिन साठे, यांच्यासह आयोजक भाजप युवा मोर्चाचे शहराध्यक्ष संकेत चोंधे, माजी नगरसेविका आरती चोंधे, रवींद्र वकील, पंच प्रमुख चिन्मय नाईक, मा.स्वीकृत सदस्य श्री.गोपाळ माळेकर, सामाजिक कार्यकर्ते श्री.भुलेश्वर नांदगुडे, श्री.काळूराम नांदगुडे, श्री.रामदास कस्पटे, श्री. प्रसाद कस्पटे, श्री.शिवराज लांडगे, श्री.दिनेश यादव, श्री.दिगंबर गुजर, श्री.उदय गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना शंकर जगताप म्हणाले की, शहरातून आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविण्यासाठी खेळाडूंना योग्य सुविधा पुरविणे गरजेचे आहे. शहर भाजपच्या वतीने सातत्याने खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. यामुळे स्थानिक खेळाडूंना आपला खेळ उंचावण्यास मोठ्या प्रमाणात सहाय्य मिळते.

स्पर्धेत १० वर्षांखाली गटात १० रेटेड खेळाडूंसह ८७, १४ वर्षांखालील गटात १० रेटेड खेळाडूसह ८३ खेळाडू व खुल्या गटात २२ रेटेड खेळाडूसह १०७ अशा तब्बल २७७ खेळाडू सहभागी झाले होते. १० वर्षांखालील गटात इशान अर्जुन, १४ वर्षांखालील गटात अलौकिक सिन्हा तर खुल्या गटात बुमीनाथन ललितादितायनार यांनी विजेतेपद पटकावले.

> स्थानिक स्पर्धांच्या माध्यमातूनच खेळाडूचा खेळ बहरत असतो. त्यामुळे खेळाडूंनी सातत्याने खेळाचा आणि स्पर्धांचा सराव करणे गरजेचे असते. केंद्र सरकार, राज्य सरकार किंवा महानगरपालिका सातत्याने खेळाडूंना खेळामध्ये प्रोत्साहित करण्यासाठी विविध योजना अंमलात आणते. या योजनांचा खेळाडूनी लाभ घेतल्यास त्यांना आपल्या खेळात पुढे जाण्यासाठी नक्कीच साहाय्य मिळणार आहे.
>
> **-शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा..




# सरकार शेतकऱ्यांच्या विरोधात का?

**सरकारची आयात-निर्यातीसंदर्भातील धोरणे अनेकदा शेतकऱ्यांच्या विरोधात जाताना दिसतात. अनेक योजना जाहीर केल्या जातात, मोठ्या घोषणा केल्या जातात, पण या योजना-घोषणा अनेक अटी-शर्तींच्या जंजाळात अडकल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांचा लाभ प्रत्यक्षात मिळतच नाही.**

आज देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे उलटून गेली, देश स्वतंत्र झाल्यानंतर राज्य घटना तयार करण्यात आली. घटनेने सर्व भारतीय नागरिकांना मूलभूत अधिकार दिले. या अधिकारांत शेतीसंदर्भातील अधिकारांचादेखील समावेश होता. असे असताना आज शेतकऱ्यांना त्यांनी स्वत: कष्ट करून पिकवलेल्या अन्न-धान्याची किंमत का ठरवता येत नाही? कारखान्यात तयार होणाऱ्या वस्तूंची किंमत संबंधित मालक ठरवतो, त्याच प्रकारे शेतकऱ्याला तो अधिकार का दिला जात नाही? देशाच्या अर्थव्यवस्थेला शेतीचा ७० टक्के आधार आहे. शेतकरी एवढी महत्त्वाची भूमिका बजावत असूनही शेतमालाला योग्य बाजारभाव मिळत नाही. शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणात, विवाहात यामुळे अडथळे येतात. कर्जाचा डोंगर होतो आणि त्याच्या ओझ्याखाली पिचलेला शेतकरी काही वेळा आत्महत्येचा मार्ग पत्करतो. यासंदर्भातील बातम्या वाचल्या



की प्रश्न पडतो, राज्यघटनेने सर्वांना हक्क, अधिकार, स्वातंत्र्य दिले मग ७५ वर्षे उलटूनदेखील शेतकरी पारंतत्र्यात जगत आहे, असे का जाणवते? हवामान बदलाचे चटके सर्वाधिक या बळीराजाला जाणवू लागले आहेत. कधी अतिवृष्टी, कधी दुष्काळसदृश परिस्थिती, कधी अवकाळी पाऊस, कधी गारपीट, तर कधी पिकांवरील आजार यांनी शेतकरी बेजार झालेले असतात. अनेक आव्हानांना धीराने तोंड देत ते शेतातून सोने पिकवण्यासाठी झटतात, मात्र हेच सोने बाजारात गेल्यानंतर मातीमोल ठरते, तेव्हा त्याचा धीर सुटतो. एका बाजूला म्हणायचं शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. 'जय जवान जय किसान'चा नारा द्यायचा पण अशा या किसानाला स्वातंत्र्य आहे का? ज्यावेळी शेतमालाचा भाव वाढतो, त्यावेळी सरकार तो भाव पडण्याचे काम करते.

ज्यावेळी कवडीमोल भाव असतो त्यावेळी शेतकऱ्यांकडे लक्ष देण्यासाठी कुठलाही राजकीय पक्ष, पुढारी नसतो. बाजारात ठराविक शेतमालाला मागणी जास्त असते, परंतु जेवढी मागणी तेवढा पुरवठा होत नसला तर बाजारभाव वाढतो हे अर्थशास्त्राचे अगदी मूलभूत तत्त्व. मग बजरपेठेत शेतमाल उपलब्ध नसला, तरीही बाजारभाव पडण्याचा सरकारकडून प्रयत्न होतो. अशा वेळी जे दोन पैसे शेतकऱ्याला मिळणार असतात, त्यापासूनही त्याला वंचित ठेवण्याचा प्रयत्न सरकार का करते? कांदा अनुदान १५ ऑगस्टपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग होईल, अशी घोषणा करण्यात आली होती, परंतु १५ ऑगस्ट उलटून गेला तरीदेखील कांदा अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग झालेले नाही. त्याबाबत नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली होती, परंतु अद्याप कुठलीही कारवाई झालेली नाही. यावरून काय समजायचे? शेतकरी स्वतःच्या हक्कांसाठी लढा देऊ शकत नाही. हा आश्वासनांचा पाऊस हे त्याचे रडगाणे थांबविण्यासाठी सरकारने दाखविलेले लॉलीपॉप आहे. तीन इंजिनांचे सरकार असूनदेखील शेतकरीविरोधी धोरण अवलंबिली जात आहेत. अशी स्थिती असतानाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सतत ठामपणे सांगत असतात, हे शेतकऱ्यांचे, सर्वसामान्य जनतेचे सरकार आहे. हे कोणत्या प्रकारच्या शेतकऱ्यांचे सरकार समजावे? जे काही निर्णय झाले, आश्वासने दिली ती शेतकऱ्यांच्या विरोधातच आहेत. शेतकरी आवाज उठवू लागला, की राजकीय दबाव आणला जातो. कांदा खरेदीची स्थिती जाणून घेऊया... नाफेडमार्फत कांदा खरेदी करावी अशी शेतकऱ्यांची अट होती. केंद्र सरकारने नाफेडमार्फत कांदा खरेदी करण्यास सुरुवात केलीही, मात्र अटींची यादीदेखील प्रसिद्ध करण्यात आली. या अटी पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला कांदा शेतकऱ्यांकडे नव्हता. अशा वेळी कोणत्याही अटी-शर्तींशिवाय शेतकऱ्यांचा कांदा खरेदी केला जाणे अपेक्षित होते, मात्र केंद्र सरकार हे शेतकऱ्यांच्या विरोधात असल्याचेच दिसते. प्रत्येक गोष्टीत अटी ठेवल्या जातात. कोणत्याही घोषणा योजनांचा शेतकऱ्यांना फायदा घेता येत नाही. सर्व अटी पूर्ण करण्यासारखा कांदा शेतकऱ्याच्या चाळीत नाही, म्हणून नाफेड कांदा खरेदी करत नाही.

## संपादकीय »

# मी पुतिन...!

***हुकूमशहा भित्रा वाटावा इतका सावध असतो, यास पुतिन अपवाद नसल्यानेच त्यांच्या टीकाकारांखेरीज काही समर्थकांनाही मरण आले..***

रशियातील बदनाम खासगी 'वॅग्नेर आर्मी'चा प्रमुख येवजेनी प्रिगोझिन यांच्या मरणावर शिक्कामोर्तब होणे, ही केवळ औपचारिकता होती. ती पार पडली आणि प्रिगोझिन यांचे खरोखरच निधन झाल्याचे जाहीर झाले. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांस आव्हान देणारा आणखी एक त्यांचा मित्रोत्तर शत्रू निजधामास पोहोचला. दोन दिवसांपूर्वी प्रिगोझिन हे आपल्या साथीदारांसह रशियाकडे येत असताना त्यांच्या विमानाचा हवेत स्फोट झाला आणि ते कोसळले. त्यामुळे प्रिगोझिन यांच्या विमानास अपघात झाला असे भासवण्याचे प्रयत्न झाले तरी हा अपघात नाही; घातपात आहे हे त्या क्षणापासून स्वच्छ दिसत होते. हे सत्य नंतर उघड झाले. या विमानात बॉम्बस्फोट घडवला गेला. त्यामुळे ते पडले आणि त्यातील सर्वच्या सर्व दहा जण मारले गेले. त्यांत प्रिगोझिन यांचा समावेश होता. तथापि त्यांच्या मरणाची बातमी निश्चित होत नव्हती.

**चंद्रयान- ३ च्या यशाचा स्वाभाविक जल्लोष सुरू असताना काँग्रेसचे नेते जयराम रमेश यांनी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या काळापासून या विषयात काय काय घडून आले याचा आढावा घेणारा मजकूर समाजमाध्यम मंचावर प्रकाशित केला. त्यांची थेट व्यक्त न झालेली भूमिका ही होती की आजच्या यशाचा पाया 'आमच्या' काळात घातला गेला याचे विस्मरण होऊ नये.**

# 'घराणेशाही क्विट इंडिया', कशासाठी?

इथे जयरामजी हे विसरतात की गतकाळातील व्यक्तीच्या योगदानाचे स्मरण म्हणूनच लँडरचे नाव विक्रम साराभाई यांच्या स्मृत्यर्थ 'विक्रम' असे ठेवण्यात आले होते. याच जयराम रमेश यांनी अलीकडे, दिल्लीच्या प्रतिष्ठित नेहरू मेमोरिअल म्युझियम अँड लायब्ररी (एनएमएमएल) या संस्थेचे स्वरूपच बदलल्यामुळे जे नवे स्वाभाविक नामकरण झाले त्याबद्दलही बरीच आगपाखड केली. या २७ एकरांच्या विस्तीर्ण परिसरात पूर्वी फक्त जवाहरलाल नेहरूंचे स्मारक होते. तेही बरेचसे ठोकळेबाज जुन्या वस्तुसंग्रहालय शैलीतील. त्या जागेचा उपयोग सर्व भूतपूर्व पंतप्रधानांबद्दल देशाची कृतज्ञता अभिव्यक्त करण्यासाठी करून सध्याच्या सरकारने तिथे 'प्रधानमंत्री संग्रहालय' उभे केले. राजीव गांधी, मोरारजी देसाई, इंद्रकुमार गुजराल, अटलबिहारी वाजपेयी अशा सर्वच माजी पंतप्रधानांचा यथोचित गौरव झाला आहे. त्यामुळेच त्याचे



नाव प्रधानमंत्री मेमोरिअल म्युझियम अँड लायब्ररी म्हणजे 'पीएमएमएल' करण्याचा निर्णय कायद्याच्या चौकटीत राहून झाला. या घटनेचे 'नेहरूंविषयी आकस किंवा दुजाभाव' अशा स्वरूपात वर्णन करण्यात आले, ते वास्तविक नाही हे इथे नव्या दिमाखात आणि अधिक उद्बोधक स्वरूपात उभी राहिलेली 'नेहरू गॅलरी' पाहिल्यानंतर कोणालाही उमगेल. या दोन्ही घटनांचा उल्लेख करण्याचे कारण म्हणजे 'सांगे वडिलांची कीर्ती' या मानसिकतेतून बाहेर न पडण्याची काँग्रेस वा अन्य घराणेबाज राजकीय पक्षांची प्रवृत्ती. परवाच्या स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घराणेशाहीवर पुन्हा एकदा कठोर टीका केली. त्या टीकेची चर्चा करताना अनेकांनी भाजपमध्येही घराणेशाही असल्याचे दावे केले होते. असे दावे करणारे हे विसरतात की घराणेशाहीच्या धर्तीवर वर्षांनुवर्षे राजकीय पक्ष संघटना चालविणे आणि पक्षात एकाच कुटुंबातील काही जणांना संधी देणे, नेतृत्व देणे या भिन्न गोष्टी आहेत. भाजपमध्ये एकाच कुटुंबातील दोन व तीन व्यक्तींना एकाच कालखंडात काही संधी मिळाल्याची उदाहरणे आहेत. पण ती पक्षाच्या संविधानानुसार निवडून आलेल्या नेतृत्वाच्या निर्णयामुळे. भाजपचे हे नेतृत्व ना आज एखाद्या 'घराण्यामुळे' आहे; ना काल तसे ते होते, ना उद्या ते तसे राहील. अडवाणी, व्यंकय्या नायडू, राजनाथ सिंह, नितीन गडकरी, अमित शहा वा जे. पी. नड्डा यांपैकी कोणाचेच वडील व आजोबा पक्षाध्यक्ष नव्हते आणि आता मुले, नातू/ पणतू यांना पक्षाध्यक्ष म्हणून संधी मिळेल असे ना त्यांना वाटते, ना इतरांना. घराणेबाज पक्ष आणि भाजप यात फरक आहे तो हाच.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# टोलवसुलीमध्ये आर्थिक गैरव्यवहार!

## श्वेतपत्रिकेद्वारे वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी : दानवे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील टोल वसुली करणाऱ्या कंपन्यांमध्ये आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचा आरोप करत उड्डाणपूलांसाठी झालेला खर्च, टोल वसुलीचा कालावधी तसेच टोल वसूलीतून मिळालेली रक्कम याबाबत राज्यातील सर्व टोल नाक्याबाबत श्वेतपत्रिका काढून याबाबतची वस्तुस्थिती राज्यातील जनतेसमोर आणावी.**

मुंबईत सुमारे 55 उडाणपुलाचा खर्च वसूल करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) यांनी MEP Infrastructure या कंपनीस सन 2010 पासून मुंबईच्या प्रवेश द्वाराजवळ टोल वसूल करण्यास परवानगी दिलेली आहे. तथापि सदर उड्डाणपूलासाठी झालेल्या खर्चाची वसुली पूर्ण होवूनही सदर कंपनीद्वारे टोलवसुली सुरु आहे. त्याचा नाहक भुर्दंड राज्यातील सर्वसामान्य जनतेला सोसावा लागत आहे. राज्यातील टोल वसुली करणाऱ्या कंपन्यांमध्ये आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचा आरोप करत उड्डाणपूलांसाठी झालेला खर्च, टोल वसुलीचा कालावधी तसेच टोल वसूलीतून मिळालेली रक्कम



याबाबत राज्यातील सर्व टोल नाक्याबाबत श्वेतपत्रिका काढून याबाबतची वस्तुस्थिती राज्यातील जनतेसमोर आणावी.

याचप्रमाणे राज्यातील अनेक टोलसंदर्भात खर्च वसुली पूर्ण होऊन देखील गत काही वर्षापासून टोल वसूली सुरु आहे. टोलवसुलीची खरी आकडेवारी संबंधित कंपन्यांकडून लपविली जात आहे. राज्यातील टोल वसुली करणाऱ्या कंपन्यांमध्ये आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचा आरोप करत उड्डाणपूलांसाठी झालेला खर्च, टोल वसुलीचा कालावधी तसेच टोल वसूलीतून मिळालेली रक्कम याबाबत राज्यातील सर्व टोल नाक्याबाबत श्वेतपत्रिका काढून याबाबतची वस्तुस्थिती राज्यातील जनतेसमोर आणावी. यात मोठ्या प्रमाणात आर्थिक गैर व्यवहार होत असल्याची बाब निदर्शनास आली असल्याचा आरोप अंबादास दानवे यांनी केला आहे. उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता रस्ते, उड्डाणपूल यासाठी झालेला खर्च टोल वसुलीचा कालावधी तसेच टोल वसूलीतून मिळालेली रक्कम याबाबत राज्यातील सर्व टोल नाक्याबाबत श्वेतपत्रिका काढून याबाबतची वस्तुस्थिती राज्यातील जनतेसमोर आणावी, अशी मागणी दानवे यांनी केली आहे.

### कालावधी संपूनही वसुली सुरुच

» अनेक टोलसंदर्भात खर्च वसुली पूर्ण होऊन देखील गत ही वर्षापासून टोल वसूली सुरु आहे. टोलवसुलीची खरी आकडेवारी संबंधित कंपन्यांकडून लपविली जात आहे. राज्यातील टोल वसुली करणाऱ्या कंपन्यांमध्ये आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचा आरोप करत उड्डाणपूलांसाठी झालेला खर्च, टोल वसुलीचा कालावधी तसेच टोल वसूलीतून मिळालेली रक्कम याबाबत राज्यातील सर्व टोल नाक्याबाबत श्वेतपत्रिका काढून याबाबतची वस्तुस्थिती राज्यातील जनतेसमोर आणावी. यात मोठ्या प्रमाणात आर्थिक गैर व्यवहार होत असल्याची बाब निदर्शनास आली असल्याचा आरोप अंबादास दानवे यांनी केला आहे.

# बाबरी अयोध्येचा मुद्दा संपलाय!

## न्यायालयाने हा मुद्दा संपवला : राऊत

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अयोध्येतील राम मंदिराचे काम अंतिम टप्प्यात आले असून जानेवारी २०२४ पर्यंत या मंदिराचे लोकार्पण करण्यात येणार असल्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी मोठा आरोप केला होता. राम मंदिराच्या उद्घाटनावेळी भाजपा सरकारकडून मोठा हल्ला केला जाऊ शकतो, अशी शक्यता त्यांनी वर्तवली आहे.**



### ट्रेनवर दगडफेक केली जाईल

» "सत्यपाल मलिक म्हणाले की पुलवामा झाला नाही केला गेला. गोध्राबाबतही असंच म्हटलं जातं. त्यामुळे २०२४ ची निवडणूक जिंकण्यासाठी लोकांच्या मनात भीती निर्माण करण्याकरता राम मंदिराच्या उद्घाटनावेळी देशभरातील लोकांना बोलावून एका भागात ट्रेनवर दगडफेक केली जाईल, अशी भिती आम्हा सर्वांच्या मनात आहे", असं राऊत म्हणाले.

ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनीही सत्यपाल मलिक यांच्या दाव्याचा संदर्भ घेत ही भीती व्यक्त केली आहे. तर, ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनीही असाच आरोप केला आहे. आज त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना याबाबत भाष्य केलं. "राम मंदिराच्या उद्घाटनावेळी देशभरातून, देशाच्या कानाकोपऱ्यातून ट्रेनने लोकांना बोलावलं जाईल. यातील एखाद-दुसऱ्या ट्रेनवर दगडफेक केली जाईल. पुलवामाप्रमाणे धर्मांधतेचा आगडोंब उसळवणार नाही ना अशी भीती वाटतेय. जर पुलवामा घडवला जाऊ शकतो, गोध्रा घडवलं गेलंय असं म्हटलं जातंय. त्यामुळे, अशा प्रकारची घटना २०२४ च्या निवडणुकीसाठी केली जाईल, अशी भीती देशातील अनेक प्रमुख पक्षांना वाटतेय. इंडियाच्या बैठकीत यावर चर्चा होईल. पण आम्ही अत्यंत सावध आहोत", असं संजय राऊत म्हणाले. "बाबरी अयोध्येचा मुद्दा संपलेला आहे. हा मुद्दा काढणारा मुर्ख आहे. सर्वोच्च न्यायालयाने हा मुद्दा संपवला म्हणूनच तिथे राम मंदिर होतंय. त्याचं श्रेय कोणी घेऊ नये. त्याचं श्रेय घ्यायचं असेल जे हजारो करसेवक मारले गेले त्यांना द्यावं लागेल, त्यात शिवसेनेचा सहभाग आहे", असंही संजय राऊत म्हणाले. "सत्यपाल मलिक म्हणाले की पुलवामा झाला नाही केला गेला. गोध्राबाबतही असंच म्हटलं जातं. त्यामुळे २०२४ ची निवडणूक जिंकण्यासाठी लोकांच्या मनात भीती निर्माण करण्याकरता राम मंदिराच्या उद्घाटनावेळी देशभरातील लोकांना बोलावून एका भागात ट्रेनवर दगडफेक केली जाईल, अशी भिती आम्हा सर्वांच्या मनात आहे", असं राऊत म्हणाले. "नितीन गडकरी हे देशातील महत्त्वाचे नेते आहेत. ते कार्यक्षम मंत्री आहेत. देशभरात त्यांनी केलेलं कामच सध्या दिसतंय. ते भविष्यामधील या देशाचे नेतृत्व आहेत.

# शिंदेच्या गटाचे नेते राज ठाकरेंच्या भेटीला

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

राज्याच्या राजकारणात कधी काय होईल, याचा अंदाजही बांधता येत नाही. त्यामुळे आता प्रत्येक राजकीय घडमोडींकडे सर्वांचेच बारीक लक्ष असते. त्यातच गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सत्ताधारी आणि विरोधक दोघांचाही समाचार घेत आहे. मुंबई-गोवा महामार्गाच्या दुरावस्थेबाबत त्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

त्या विरोधात मनसेचे आंदोलनही सुरू झाले आहे. इतकेच नाही तर विविध मतदार संघाच्या आढाव्याच्या माध्यमातून राज ठाकरे यांनी निवडणुकीची तयारी देखील सुरू आहे. त्यात आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शरद पवार यांच्या गटाच्या नेत्यांनी राज ठाकरे यांची भेट घेतल्याने राज्यात चांगलीच चर्चा रंगली आहे. राज ठाकरे राहत असलेल्या शिवतीर्थ या निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे नेते



अनिल देशमुख यांनी राज ठाकरे यांची भेट घेतली. तर दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्या गटाचे नेते प्रताप सरनाईक देखल राज ठाकरे यांच्या भेटीला पोहोचले.

या दोन्ही नेत्यांच्या भेटीमुळे राजकारणात नेमके काय सुरू आहे? असा प्रश्न उपस्थित होत आहे. आमदार प्रताप सरनाईक यांनी प्रो गोविंदा स्पर्धेचे निमंत्रण देण्यासाठी राज ठाकरे यांची भेट घेतल्याचे सांगितले आहे. याचे आयोजन युवासेनचे पुर्वेश सरनाईक यांच्या वतीने करण्यात आले आहे.

त्यामुळे आपण निमंत्रण दिले असल्याचे सरनाईक म्हणाले आहेत. तर अनिल देशमुख सध्या शरद पवार यांच्यासोबत राज्याचा दौरा करत आहेत. या दरम्यान त्यांनी राज ठाकरे यांची भेट घेतल्याने अनेक तर्कवितर्क लावले जात आहे.

# मणिपूर अधिवेशन चर्चेविना स्थगित!

## 8 आमदार अनुपस्थित; राज्यात आतापर्यंत 160 मृत्यू

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मणिपूरमध्ये 3 मे पासून कुकी आणि मेईतेई समुदायामध्ये आरक्षणावरून हिंसाचार सुरू आहे. 120 दिवसांपासून सुरू असलेल्या हिंसाचारात आतापर्यंत 160 हून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. दरम्यान, राज्य सरकारच्या मागणीनुसार आज विधानसभेचे एक दिवसीय अधिवेशन होणार होते. राज्यात शांतता प्रस्थापित करण्याबाबत चर्चा होणे अपेक्षित होते. मात्र, गदारोळामुळे अधिवेशन अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आले.**

सीएम एन बिरेन सिंह यांनी 21 ऑगस्ट रोजी राज्यपाल अनुसुईया उईके यांना अधिवेशन सुरू करण्याची शिफारस केली होती. 22 ऑगस्ट रोजी राजभवनाने अधिसूचना जारी केली. घटनेच्या कलम 174 (1) नुसार कोणत्याही सभागृहाच्या दोन अधिवेशनांमध्ये सहा महिन्यांपेक्षा जास्त अंतर नसावे. मणिपूरमध्ये शेवटचे अधिवेशन मार्चमध्ये झाले होते. अशा स्थितीत सहा महिन्यांची मुदत सप्टेंबरमध्ये संपत होती. दोन मंत्र्यांसह दहा आमदारांनी सुरक्षेचे कारण देत अधिवेशनाला उपस्थित राहण्यास नकार दिला. हे सर्व आदिवासी कुकी समाजातून आलेले आहेत. यामध्ये एलएम खौटे, न्गुरसांगलुर सनाटे, लेटपाओ हाओकिप, लेटझमँग हाओकीप, पाओलिनलाल हाओकिप, वुंगजगिन वाल्टे, हाओहोलेट किपगेन (स्वतंत्र), किमनेओ हाओकीप हँगशिंग (केपीए), चिनलुंगथांग (केपीए) यांचा समावेश आहे. मात्र, सीएम बिरेन सिंग यांनी त्यांना संपूर्ण सुरक्षा देण्याचे आश्वासन दिले होते. 20 जुलै ते 11 ऑगस्टपर्यंत चाललेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात मणिपूरचा मुद्दा उपस्थित झाला. 26 जुलै रोजी, विरोधी आघाडी भारतीय राष्ट्रीय विकास समावेशक आघाडी म्हणजेच इंडियाने मणिपूरवर चर्चा करण्यासाठी अविश्वास प्रस्ताव दिला. काँग्रेस खासदार गौरव गोगोई यांनी हा प्रस्ताव आणला होता. त्यावर 8 ते 10 ऑगस्ट या कालावधीत चर्चा झाली.

9 ऑगस्ट रोजी राहुल यांनी 35 मिनिटांच्या भाषणात भारत जोडो यात्रा आणि मणिपूरवर भाष्य केले. दुसरीकडे, 10 ऑगस्ट रोजी मोदींनी 2 तास 12 मिनिटांचे भाषण केले, ज्यामध्ये ते 1 तास 32 मिनिटांनी मणिपूरवर बोलले. मोठी गोष्ट म्हणजे जेव्हा पंतप्रधान मणिपूरवर बोलू लागले तेव्हा विरोधकांनी सभागृहातून सभात्याग केला होता. 12 तासांच्या चर्चेनंतर मोदी सरकारला 325 मते मिळाली. विरोधकांना 126 मते मिळाली. त्यानंतर अविश्वास ठराव फेटाळला गेला. मणिपूरचा मुद्दा केवळ संसदेतच नव्हे तर देशातील इतर राज्यांच्या विधानसभांमध्येही चर्चिला गेला. 18 ऑगस्ट रोजी दिल्ली विधानसभेत मणिपूर हिंसाचाराचा निषेध करणारा ठराव मांडण्यात आला. त्यानंतर विरोधकांनी सभागृहातून सभात्याग केला. उत्तर प्रदेश विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाची सुरुवात गदारोळात झाली. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी 7 ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी विरोधकांना राज्याच्या प्रश्नांवर अर्थपूर्ण चर्चेसाठी एकत्र येण्याचे आवाहन केले, परंतु अखिलेश यादव यांनी मणिपूरच्या मुद्द्यावर सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. पश्चिम बंगाल विधानसभेने 31 जुलै रोजी मणिपूरमधील हिंसाचाराचा निषेध करणारा ठराव मंजूर केला. विधानसभेच्या अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात राज्याचे संसदीय कामकाज मंत्री सोवनदेव चट्टोपाध्याय यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले. या ठरावावर बोलताना मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी हिंसाचारग्रस्त राज्यातील परिस्थिती हाताळण्यात भाजप आणि केंद्र सरकारच्या भूमिकेचा निषेध केला. मणिपूरवरून झारखंड विधानसभेत 31 जुलै रोजी गदारोळ झाला होता. झारखंड विकास मोर्चाचे प्रदीप यादव यांनी सभापती रवींद्र नाथ महतो यांनी सभागृहात बसताच मणिपूरचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर भाजप आमदारांनी आक्षेप घेतला. मणिपूर हिंसाचारावर सुप्रीम कोर्टातही सुनावणी सुरू आहे. खरं तर, 19 जुलै रोजी दोन नग्न महिलांचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. ज्यात जमावाने महिलांचे कपडे काढून गावात मिरवणूक काढली. नंतर त्यांच्यावर सामूहिक बलात्कार केला. ही घटना 4 मे रोजी घडली. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची स्वत:हून दखल घेतली. समोर आलेला व्हिडिओ पाहून मला धक्का बसल्याचे सरन्यायाधीशांनी म्हटले होते. अशा घटना मान्य नाहीत. महिलांचा हिंसाचारात हत्यार म्हणून वापर करू नये. त्यावर कार्यवाही करण्यासाठी आम्ही सरकारला थोडा वेळ देत आहोत, अन्यथा कारवाई करू. सध्या या प्रकरणाची सुनावणी 28 जुलैपासून सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाने 25 ऑगस्ट रोजी मणिपूर हिंसाचाराशी संबंधित प्रकरणे शेजारच्या आसाममध्ये स्थानांतरित करण्याचे आदेश दिले. यासाठी न्यायालयाने गुवाहाटी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींना निर्देश दिले आहेत. खंडपीठाने म्हटले- मणिपूर हिंसाचाराशी संबंधित खटल्यांच्या सुनावणीसाठी एक किंवा अधिक विशेष न्यायाधीशांची नियुक्ती करा ज्यांची सीबीआय चौकशी करत आहे. मणिपूर हिंसाचारातील 21 प्रकरणे तपासासाठी सीबीआयकडे सोपवण्यात आली आहेत. सीबीआयचे 53 अधिकारी तपासात गुंतले असून त्यापैकी 29 महिला अधिकारी आहेत. सीबीआयने आतापर्यंत 8 गुन्हे नोंदवले आहेत, ज्यात मणिपूरमधील महिलांच्या कथित लैंगिक छळाच्या दोन प्रकरणांचा समावेश आहे.



### 65 हजारांहून अधिक लोकांनी घर सोडले

या हिंसाचारात आतापर्यंत 160 हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. त्याच वेळी, 6 हजारांहून अधिक लोक जखमी झाले आहेत. 65 हजारांहून अधिक लोकांनी आपली घरे सोडली आहेत. जाळपोळीच्या 5 हजारांहून अधिक घटना घडल्या आहेत. सहा हजार गुन्हे दाखल करण्यात आले असून 144 जणांना अटक करण्यात आली आहे. राज्यात 36 हजार सुरक्षा कर्मचारी आणि 40 आयपीएस तैनात करण्यात आले आहेत. डोंगर आणि खोऱ्या दोन्ही जिल्ह्यांमध्ये एकूण 129 चौक्या उभारण्यात आल्या आहेत.

# चीनने दाखवला अरुणाचल प्रदेशावर हक्क !


## चीनच्या नव्या नकाशात अरुणाचल प्रदेशाचा समावेश

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचा अविभाज्य भाग असलेल्या अरुणाचल प्रदेशवर चीनने पुन्हा एकदा दावा केला आहे. यावेळी चीनने नवा नकाशा जाहीर केला असून यामध्ये अरुणाचल प्रदेश आणि अक्साई चीन, तैवान आणि दक्षिण चीन समुद्राचा बहुतांश भाग असल्याचं नकाशात दाखवलं आहे.**

एप्रिल महिन्यात चीनने अरुणाचल प्रदेशातील ११ गावांचं नामकरण केलं होतं. यावरून मोठा वादंग निर्माण झाला होता. आता नव्या नकाशात भारताचा भाग दाखवण्यात आल्याने पुन्हा एकदा सीमेवर वातावरण तापण्याची शक्यता आहे. चीनच्या स्टॅण्डर्ड मॅप सर्व्हिस या संकेतस्थळावर नैसर्गिक संसाधन खात्याकडून चीनचा २०२३ चा अधिकृत नकाशा लॉन्च करण्यात आला, अशी माहिती चीनचे अधिकृत वृत्तपत्र असलेल्या ग्लोबल टाईम्सने ट्वीट




केली आहे. हा नकाशा चीन आणि जगातील इतर देशांच्या सीमा रेखाटण्याच्या पद्धतीवर आधारीत आहे, असंही त्यांनी ट्वीटमध्ये म्हटलं आहे. जाहीर झालेल्या नव्या नकाशानुसार अरुणाचल प्रदेश, दक्षिण तिबेट, अक्साई चीन, तैवान आणि दक्षिण सागरी भाग चीनचा भाग असल्याचं दाखवण्यात आले आहेत. अरुणाचल प्रदेश आणि अक्साई या दोन्ही क्षेत्रांबाबत चीन आणि भारतात गेल्या अनेक वर्षांपासून वाद सुरू आहेत.

अरुणाचल प्रदेशवर चीनने दावा केला असला तरीही अरुणाचल प्रदेश भारताचा अविभाज्य भाग राहिला आहे. भारताने या भूमिकेचा सातत्याने पुनरुच्चार केला आहे. अरुणाचल प्रदेश भारताचा अविभाज्य भाग आहे, होता आणि कायमस्वरुपी राहणार आह, अशी भूमिका भारताने घेतली आहे. भारताविरोधात षड्डू ठोकला असून तैवानबरोबरही तणाव निर्माण केला आहे.


### अमेरिकेने दर्शवला होता पाठिंबा

एप्रिल महिन्यात चीनने अरुणाचल प्रदेशच्या ११ जागांचे नामकरण केले होते. तेव्हा अमेरिकेने भारताला पाठिंबा दर्शवला होता. "अरूणाचल प्रदेश हे राज्य भारताचा भाग असून त्यामध्ये एकतर्फी बदलास तीव्र विरोध असल्याचे अमेरिकेने स्पष्ट केले आहे. 'प्रदीर्घ काळापासून तो भाग (अरुणाचल प्रदेश) भारतात आहे. स्थळांची नावे बदलून कुणी आपला भूप्रदेश वाढविण्याचा प्रयत्न करत असेल, तर त्याला आमचा विरोध राहील आणि हीच आमची दीर्घकाळापासून भूमिका राहिली आहे", असे व्हाईट हाऊसच्या माध्यम सचिव करीन जिन-पेरी यांनी म्हटले होते.

# जवानचे नॉट रमैया वस्तावैया गाणे!



शाहरुख खानच्या आगामी 'जवान' या चित्रपटातील नॉट रमैया वस्तावैया हे पूर्ण गाणे रिलीज झाले आहे. शाहरुखने हे गाणे सोशल मीडियावर शेअर केले आहे. गाण्याचे शीर्षक - नॉट रमैय्या वस्तावैय्या हे 1955 मध्ये आलेल्या श्री 420 चित्रपटातील रमैय्या वस्तावैया या गाण्याच्या संदर्भात आहे. 'हे छैय्या छैया नाही. रमैय्या वस्तावैय्या नाही. हा जवानचा ता था थैया आहे. धन्यवाद, विशाल ददलानी, शिल्पा राव, अनिरुद्ध, कुमार, या गाण्यामागे अनेक कथा आहे. मात्र या कथा 31 तारखेसाठी ठेवूया, जेव्हा चित्रपटाचा ट्रेलर बाहेर येईल. सध्या माझ्यासोबत नृत्य करा, पूर्ण गाणे आले आहे. जवान येत्या 7 सप्टेंबरला रिलीज होत आहे.' असे ट्विट शाहरुखने केले आहे. ट्विटरवर हे गाणे शेअर करताना शाहरुख खानने लिहिले - प्रत्येकजण चित्रपटाच्या ट्रेलरची आतुरतेने वाट पाहत आहे. त्यामुळे आता मी पुन्हा कामाला लागलो. टी-सीरीज, संगीतकार अनिरुद्ध आणि दिग्दर्शक ॲटली यांना टॅग करत त्यांनी लिहिले की, मी हे गाणे शेअर करावे अशी त्यांची सर्वांची इच्छा होती, म्हणून नुकताच टीझर शेअर केला आहे. एडिटर अँटोनी रुबेनला टॅग करत त्यांनी लिहिले – आता मी ट्रेलरच्या कामावर परत आलो आहे. आत्तासाठी अलविदा, सर्वांना खूप प्रेम! या गाण्यात शाहरुखही हात पसरून सिग्नेचर स्टेप करताना दिसत आहे. त्याच्या आधीच्या गाण्यांचाही या गाण्याच्या बोलांमध्ये उल्लेख आहे. या गाण्याचे बोल आहेत- पहेले करू छैय्या छैय्या रे, अब करू ताता थैया! या गाण्यात 1998 च्या दिल से चित्रपटातील छैय्या छैय्या या गाण्याचा संदर्भ देखील आहे. या चित्रपटात नयनतारासोबत शाहरुख खान मुख्य भूमिकेत दिसणार आहे.



## धर्म बदलण्यास सांगितले नाही !

नसीरुद्दीन शहा यांनी अलिकडेच पत्नी रत्ना पाठकसोबतच्या लग्नाबद्दल चर्चा केली. धर्माबाबत देशात सुरू असलेल्या राजकारणावरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, सध्या देशात धर्म हाही राजकीय मुद्दा बनला आहे अशा परिस्थितीत ज्यांनी दुसऱ्या धर्माच्या मुला-मुलीशी लग्न केले आहे, त्यांच्यावरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. ते म्हणाले की, त्यांच्या आईने कधीही रत्नाला धर्म बदलण्यास सांगितले नाही. नसिरुद्दीन शहा आणि रत्ना पाठक यांच्या लग्नाला 41 वर्षे झाली आहेत. नसिरुद्दीन शहा यांनी नॅशनल हेराल्ड न्यूजपेपरमध्ये एका ओपन लेटरद्वारे रत्ना पाठक यांच्याशी लग्न कसे झाले हे सांगितले होते. ते म्हणाले की, आज देशात धर्म हे राजकीय हत्यार बनले आहे. यामुळे लोक माझ्या रत्नासोबतच्या लग्नावरही प्रश्नचिन्हे उपस्थित करत आहेत. रत्नासोबत लग्न करण्याचा माझा दुसरा विचार कधीच आला नाही आणि मी हिंदूशी लग्न केल्याचा मला कधीच पश्चाताप झाला नाही. माझ्या लग्नाच्या 38 वर्षांनंतर माजी कॅबिनेट मंत्र्याचा पती माझ्या लग्नावर प्रश्नचिन्ह उभे करेल असे मला कधीच वाटले नव्हते. येथे नसिरुद्दीन शहा यांनी माजी कॅबिनेट मंत्री सुषमा स्वराज यांचे पती स्वराज कौशल यांचा उल्लेख केला आहे. नसिरुद्दीन पुढे म्हणाले- त्यावेळी माझ्यावर लव्ह जिहादचे समर्थन केल्याचा आरोप करण्यात आला होता.

## स्वरा भास्करचे रोमँटिक फोटो



स्वरा भास्कर सध्या तिच्या प्रेग्नेंसीच्या टप्प्याचा आनंद घेत आहे. दुसरीकडे, सोमवारी अभिनेत्रीने तिच्या मॅटर्निटी फोटोशूटचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले. या फोटोंमध्ये तिचा नवरा फहाद स्वरासोबत रोमँटिक पोज देताना दिसत आहे. पोस्ट शेअर करताना स्वराने फोटो काढल्याबद्दल छायाचित्रकाराचे आणि फोटोंचा भाग असल्याबद्दल तिच्या पतीचे आभार मानले. पोस्ट शेअर करताना स्वराने लिहिले- 'कधीकधी आयुष्य अचानक तुम्हाला खूप काही देते. जीवनाच्या प्रवासात, तुम्हाला स्वतःला शोधण्याची आणि एकमेकांना आधार देण्याची संधी मिळते. माझ्या आयुष्यातील हा खास क्षण बरखा अग्रवाल यांनी सुंदरपणे टिपला आहे. पोस्टमध्ये स्वराने खुलासा केला की, तिचा पती फहाद मॅटर्निटी शूटबद्दल संकोच करत होता. म्हणाली- 'इच्छा नसतानाही मला सपोर्टिंग मॉडेलप्रमाणे साथ दिल्याबद्दल धन्यवाद.' स्वराने तिच्या इंस्टाग्राम हँडलवर 6 फोटो शेअर केले आहेत. यातील काही चित्रे कृष्णधवल आहेत, तर काही रंगीत आहेत. पहिल्या चित्रात फहाद आणि स्वरा एका सुकलेल्या झाडाच्या खोडावर बसलेले दिसत आहेत. दुस-या चित्रात, हे जोडपे रोमँटिक पोज देत आहे, स्वरा तिच्या बेबी बंपला दाखवत आहे. स्वरा भास्करने 6 जून रोजी सोशल मीडियावर तिच्या गरोदरपणाची घोषणा केली होती. पती फहादसोबतचा फोटो शेअर करताना तिने एक अतिशय भावूक पोस्टही शेअर केली आहे. फोटो शेअर करताना स्वराने लिहिले- 'कधीकधी तुमची प्रत्येक इच्छा एकाच वेळी पूर्ण होते. या नवीन प्रवासात पाऊल ठेवण्यासाठी मी खूप उत्साही, आभारी आहे. फहाद आणि स्वरा यांची लव्हस्टोरी खूपच फिल्मी होती. विशेष विवाह कायदा, 1954 अंतर्गत 6 जानेवारी 2023 रोजी त्यांचे लग्न झाले. मात्र, लग्नानंतर तब्बल एक महिन्यानंतर अभिनेत्रीने ही गोष्ट अधिकृत केली. फहाद आणि स्वरा यांची पहिली भेट 2019 मध्ये एका प्रोटेस्ट दरम्यान झाली होती.

## वैजयंतीमालांनी केले भरतनाट्यम !

ज्येष्ठ अभिनेत्री वैजयंतीमाला यांनी 13 ऑगस्ट रोजी आपला 90 वा वाढदिवस साजरा केला. यावेळी त्यांनी भरतनाट्यम नृत्य सादर केले. त्यांच्या डान्सचा व्हिडिओ सोशल मीडियावर आला आहे. या व्हिडिओमध्ये वैजयंतीमाला वयाच्या 90 व्या वर्षीही चांगला डान्स करताना दिसत आहेत. अभिनेत्री पारंपारिक नृत्याच्या चालींवर उत्तम अभिव्यक्तीसह नाचताना दिसत आहेत. व्हिडिओमध्ये वैजयंती माला यांनी वाढदिवसानिमित्त आयोजित गेट-टूगेदर पार्टीत स्टेजवर काही लोकांसमोर हा डान्स केला. त्यांच्या नृत्याच्या तालावर लोक मध्येच टाळ्या वाजवत आहेत. अभिनेत्रीने सुमारे 4 मिनिटे सलग नृत्य केले. सोशल मीडिया यूजर्स या व्हिडिओवर कमेंट करत अभिनेत्रीचे कौतुक करत आहेत. एका युझरने व्हिडिओवर लिहिले - त्यांनी हे सर्व अतिशय उत्तमरित्या केले आहे. या वयातही त्यांची मुद्रा आणि त्यांचे भाव अगदी परफेक्ट आहेत. त्याच वेळी, एका वापरकर्त्याने लिहिले - वैजयंतीमाला वयाच्या 90 व्या वर्षी परिपूर्ण भरतनाट्यम नृत्य करत आहेत आणि वयाच्या 20 व्या वर्षी हे टाइप करताना माझी पाठ दुखत आहे.1950-60 च्या दशकात नागिन, देवदास, साधना, सरगम, गंगा जमुना यांसारख्या चित्रपटांमध्ये अभिनयाने या अभिनेत्रीने मने जिंकली होती.

## भाऊराव कऱ्हाडे अडकणार लग्नबंधनात?

मराठमोळे आणि लोकप्रिय दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे यांना 'ख्वाडा'आणि 'बबन' आणि आता टीडीएम सारख्या चित्रपटांमधून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे हा मराठी मनोरंजन विश्वातील खुप प्रसिद्ध चेहरा आहे. काही दिवसांपुर्वी त्यांचा टीडीएम हा वेगळ्या थाटणीचा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. आता भाऊराव यांनी चाहत्यांसोबत एक आनंदाची बातमी शेयर केली आहे. ते लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. सोशल मीडियावर होणाऱ्या पत्नीसोबतचा फोटो शेयर करत त्यांनी ही बातमी दिली. जोडीदारासोबत फोटो शेयर करत त्यांनी कॅप्शनमध्ये लिहिलयं , "आता लवकरच खरा सिनेमा सुरू.... तुम्ही सगळ्यांनी आशिर्वाद द्यायला



नक्की यायचंय..." त्यांची ही पोस्ट सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. त्याचे चाहते त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करत आहे. भाऊ कऱ्हाडे यांनी ख्वाडा, बबन यासारऱ्या अस्सल गावरान ढंगातील, रंगातील चित्रपट प्रेक्षकांसमोर आणत आपली वेगळी ओळख निर्माण केले आहे. गेल्या काही दिवसांपुर्वी भाऊ आणि त्यांचा टीडीएम नावाचा चित्रपट चर्चेत आला होता. या सिनेमाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या चित्रपटाला थिएटमध्ये स्क्रिन्सच न मिळाल्यानं कलाकार, निर्माते आणि दिग्दर्शक यांच्या डोळ्यात पाणी होते. त्यानंतर अनेक राजकिय नेते आणि कलाकारांनी त्यांना पाठिंबा दिला होता. आता ते त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आले आहे. त्याच्या आयुष्याची नवीन सुरुवात ते करत आहेत.

# करुण नायरचे 40 चेंडूत शतक!

## » महाराजा ट्रॉफीमध्ये 42 चेंडूत 107 धावांची नाबाद खेळी

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**टीम इंडियातून बाहेर पडणारा कर्नाटकचा खेळाडू करुण नायर याने कर्नाटच्या देशांतर्गत टी-20 लीग महाराजा ट्रॉफीमध्ये 40 चेंडूत शतक झळकावले आहे. म्हैसूर वॉरियर्स संघासाठी त्याने 42 चेंडूत नाबाद 107 धावांची खेळी केली. रविवारी महाराजा ट्रॉफीचा दुसरा उपांत्य सामना म्हैसूर वॉरियर्स आणि गुलबर्गा मिस्टिक्स यांच्यात झाला. नाणेफेक जिंकल्यानंतर गुलबर्गा मिस्टिक्सने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.**

प्रथम फलंदाजी करताना म्हैसूर वॉरियर्सने 2 बाद 248 धावा केल्या. तर गुलबर्ग मिस्टिक्स संघाने निर्धारित षटकात 8 गडी गमावून 212 धावा केल्या.

वीरेंद्र सेहवागनंतर कसोटीत त्रिशतक झळकावणारा करुण नायर दुसरा भारतीय आहे. नायरने 2016 मध्ये चेन्नई येथे इंग्लंडविरुद्ध नाबाद 303 धावांची खेळी केली होती. 2017 पासून तो टीम इंडियातून बाहेर आहे. करुणने शेवटची कसोटी 2017 मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध धर्मशाला येथे खेळली होती.

या सामन्यात करुण नायर फलंदाजीला आला तेव्हा



त्याच्या संघाची धावसंख्या 8.3 षटकात 1 बाद 81 अशी होती, त्यानंतर नायरने त्याच्या सहकारी फलंदाजासह आघाडी सांभाळली आणि धावगती वाढवली.

नायरने 42 चेंडूंचा सामना करत 7 चौकार आणि 9 षटकारांच्या मदतीने 107 धावांची नाबाद शतकी खेळी केली. शतकी खेळी खेळल्यानंतर त्याने जल्लोष साजरा केला. करुण नायरने टीम इंडियासाठी 6 कसोटीत 62.3 च्या सरासरीने 374 धावा केल्या आहेत. त्याचबरोबर त्याने 2 एकदिवसीय सामन्यात 23 च्या सरासरीने 46 धावा केल्या आहेत. कसोटीत 300 च्या वर धावा करणारा तो दुसरा भारतीय फलंदाज आहे. त्याच्या आधी वीरेंद्र सेहवागने कसोटीत 300 हून अधिक धावा केल्या आहेत. सेहवागने 2004 मध्ये मुलतानमध्ये पाकिस्तानविरुद्ध 304 आणि चेन्नईमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध 319 धावा केल्या होत्या.

### म्हैसूर वॉरियर्स 36 धावांनी विजयी

» या सामन्यात करुण नायर फलंदाजीला आला तेव्हा त्याच्या संघाची धावसंख्या 8.3 षटकात 1 बाद 81 अशी होती, त्यानंतर नायरने त्याच्या सहकारी फलंदाजासह आघाडी सांभाळली आणि धावगती वाढवली. नायरने 42 चेंडूंचा सामना करत 7 चौकार आणि 9 षटकारांच्या मदतीने 107 धावांची नाबाद शतकी खेळी केली. शतकी खेळी खेळल्यानंतर त्याने जल्लोष साजरा केला.

# राहुल ग्रुप स्टेजमध्ये खेळणार नाही!

## » राहुल पूर्णपणे तंदुरुस्त नाही : राहुल द्रविड

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारताचा यष्टीरक्षक फलंदाज केएल राहुल दुखापतीमुळे आशिया चषक 2023 च्या ग्रुप स्टेजमधील सामन्यांना मुकणार आहे. त्यात 2 सप्टेंबरला होणाऱ्या पाकिस्तानविरुद्धच्या सामन्याचाही समावेश आहे. भारत ग्रुप स्टेजमध्ये दोन सामने खेळणार आहे. पहिला सामना पाकिस्तानविरुद्ध तर दुसरा सामना नेपाळविरुद्ध होणार आहे. भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत सांगितले की, केएल राहुल एनसीए (नॅशनल क्रिकेट अकादमी) मध्ये बेंगळुरूमध्येच राहणार आहे आणि ग्रुप स्टेजमध्ये खेळणार नाही. आशिया चषक सुपर-4 टप्प्यापूर्वी 4 सप्टेंबरला संघात परतण्यापूर्वी त्याचे पुनर्मूल्यांकन केले जाईल. आशिया कपसाठी जाहीर करण्यात आलेल्या 17 सदस्यीय संघात राहुलचा समावेश आहे.**

द्रविडने सांगितले की, गेल्या



### राहुल महत्त्वाचा का?

» राहुल विकेटकीपिंग करतो आणि कोणत्याही स्थानावर फलंदाजी करण्यास सक्षम फलंदाज आहे. त्याने दीर्घकाळ संघासाठी सलामीला फलंदाजी केली आहे. परंतु निवडकर्त्यांना आता त्याला नंबर-5 वर खेळवायचे आहे आणि त्याच्याकडे कोणत्याही स्थानावर खेळण्याची क्षमता आहे.

एका आठवड्यापासून त्याने एनसीएमध्ये चांगली कामगिरी केली आहे. राहुलमध्ये प्रगती दिसत आहे. राहुलला पूर्णपणे तंदुरुस्त होण्यासाठी आम्हाला अधिक वेळ द्यायचा आहे. आशिया चषक स्पर्धेतील ग्रुप स्टेज सामन्यांमधून राहुल बाहेर असणार आहे. तो काही दिवस एनसीएमध्येच घालवेल. सुपर-4 स्टेजपूर्वी 4 सप्टेंबरला आम्ही राहुलचे पुनर्मुल्यांकन करू. मला खात्री आहे की तो पुनरागमन करेल. सध्या राहुल संघासोबत प्रवास करणार नाही. द्रविड पुढे म्हणाला की, आम्ही सध्या नंबर 4 आणि 5 नंबर शोधत आहोत, असे नाही. गेल्या 18 महिन्यांपासून आमच्यासाठी क्रमांक 4 आणि क्रमांक 5 निश्चित करण्यात आले होते. केएल राहुल, श्रेयस अय्यर आणि ऋषभ पंत यांचा प्लॅनमध्ये समावेश होता. मात्र, हे तिन्ही खेळाडू दोन महिन्यांतच जखमी झाले. सर्वांना गंभीर दुखापत झाली. चांगली गोष्ट म्हणजे आमच्याकडे सध्या 3 पैकी 2 खेळाडू उपलब्ध आहेत. राहुल विकेटकीपिंग करतो आणि कोणत्याही स्थानावर फलंदाजी करण्यास सक्षम फलंदाज आहे. त्याने दीर्घकाळ संघासाठी सलामीला फलंदाजी केली आहे. परंतु निवडकर्त्यांना आता त्याला नंबर-5 वर खेळवायचे आहे आणि त्याच्याकडे कोणत्याही स्थानावर खेळण्याची क्षमता आहे. आशिया चषकासाठी टीम इंडिया 30 ऑगस्टला बेंगळुरूहून कोलंबोला रवाना होण्याची शक्यता आहे. आशिया चषकात भारताचा पहिला सामना 2 सप्टेंबर रोजी पल्लेकेले येथे पाकिस्तान विरुद्ध होणार आहे.

# सॅमसन-बुमराह आशिया कपसाठी भारतीय संघात

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारतीय क्रिकेट संघाने आशिया चषक २०२३ची तयारी जवळपास पूर्ण केली आहे. संघातील खेळाडू कर्नाटकातील बंगळुरूमधील अलूर येथील शिबिरात सहभागी होत असले तरी. अशा परिस्थितीत स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि फलंदाज संजू सॅमसन देखील शिबिरात सामील झाले आहेत. आशिया कपसाठी श्रीलंकेला रवाना होण्यापूर्वी हे दोन्ही खेळाडू संघात सामील झाले आहेत. सॅमसन संघासाठी राखीव खेळाडू श्रीलंकेला जाणार आहे.

आशिया कप २०२३साठी श्रीलंकेला जाण्यापूर्वी टीम इंडियाच्या खेळाडूंना यो-यो टेस्ट सारखी फिटनेस टेस्ट द्यावी लागली. या यादीत कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहली आणि शुबमन गिल या नावांचा समावेश होता. मात्र, आता जसप्रीत बुमराह आणि संजू सॅमसन देखील यो-यो टेस्ट सारखी फिटनेस टेस्ट देऊ शकतात. याशिवाय तिलक वर्मा आणि प्रसिद्ध कृष्णा यांची लवकरच फिटनेस चाचणी होण्याची शक्यता आहे. टीम इंडियाचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आयर्लंडविरुद्ध दीड वर्षानंतर पाठीच्या दुखापतीतून संघात परतला आहे. आयर्लंड दौऱ्यावर बुमराहकडे कर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली असली, त्याने त्या मालिकेत शानदार पुनरागमन केले आहे. त्याचबरोबर बुमराह आशिया चषकापूर्वी नेटमध्ये जबरदस्त गोलंदाजी करताना दिसला होता. आशिया चषक २०२३ हा ३० ऑगस्ट ते १७ सप्टेंबर या कालावधीत पाकिस्तान आणि श्रीलंकेत खेळवला जाईल. आशिया कपची ही १६वी आवृत्ती असेल. २०२३च्या विश्वचषक स्पर्धेसाठी दोन महिन्यांपेक्षा कमी कालावधी शिल्लक असताना, ही स्पर्धा आशियातील अव्वल क्रिकेट खेळणाऱ्या देशांसाठी तयारीसारखी असेल. आशिया चषक स्पर्धेत भारत आपले सर्व सामने श्रीलंकेत खेळणार आहे आणि त्यामुळे २ सप्टेंबरला भारत-पाक सामना कँडी, श्रीलंकेत होणार आहे. आशिया कप १९८४ मध्ये सुरू झाला आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वात जुन्या स्पर्धांपैकी एक आहे.